26 JUL 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या शैक्षणिक धोरणाविषयी उलटसुलट चर्चा नको; आता अंमलबजावणीची गरज

## कुलगुरू डॉ. शिर्के; विद्यापीठात 'एनईपी-२०२० वीक @ एसयूके' सप्ताहास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नव्या शैक्षणिक धोरणातून आता माघार नाही. त्यामुळे याविषयी उलटसुलट चर्चा नको. त्याऐवजी विद्यार्थी या घटकास केंद्रबिंदू मानून त्यांना या धोरणाचे लाभ जास्तीत जास्त कशा पद्धतीने देता येऊ शकतील, या दृष्टीने आता अंमलबजावणी करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०च्या त्रैवार्षिक पूर्तीच्या निमित्ताने 'एनईपी-२०२० वीक @ एसयूके' सप्ताहास प्रारंभ झाला. या निमित्ताने विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचालक, प्रतिनिधी यांच्यासाठी विशेष कार्यशाळेत ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शिक्षणाच्या क्षेत्रात सकारात्मक बदलांचे वारे घेऊन आले आहे. शिक्षण क्षेत्रात कार्यरत सर्वच घटकांनी विद्यार्थ्यांना धोरणाचे दूरगामी लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये राज्यात आघाडी घेतली आहे. या धोरणाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करण्यासाठी लवचिकतेने आणि विद्यार्थ्यांचे कोठेही नुकसान होणार नाही, या पद्धतीने पावले उचलली आहेत.




**कोल्हापूर : विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताहानिमित्त आयोजित विशेष कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.**

प्र-कुलगुरू डॉ.पी.एस. पाटील म्हणाले, उच्च शिक्षण संस्थांच्या संरचना व कार्यामध्ये मूलभूत स्वरूपाचे बदल नव्या धोरणामुळे येत आहेत. शिक्षण क्षेत्राला वेगवेगळ्या पद्धतीने अधिकाधिक स्वायत्तता देण्यात येत आहे. शिक्षणाबरोबरच संशोधन, कौशल्य यांचाही साकल्याने विचार करण्यात आला आहे. यावेळी डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी मार्गदर्शन केले. उपकुलसचिव विलास सोयम यांनी आभार मानले.


26 JUL 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन शैक्षणिक धोरण राबवण्याची तयारी करा

## विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या संस्थाचालक, प्राचार्यांना सूचना



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संस्थापक, प्राचार्यांच्या आयोजित बैठकीत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

प्रतिनिधी

कोल्हापूर

देशभर नवीन शैक्षणिक धोरण राबवण्याचा निर्णय केंद्राने घेतला आहे. २०३५ पर्यंत सर्वच कॉलेज स्वायत्त होऊन, क्लस्टर विद्यापीठ होतील. त्यामुळे आतापासूनच नवीन शैक्षणिक धोरण राबवण्याची तयारी करा, अशा सूचना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी संस्थापक आणि प्राचार्यांना दिल्या.

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० च्या त्रैवार्षिक पूर्तीच्या निमित्ताने 'एनईपी–२०२० विक एसयुके' सप्ताहास प्रारंभ झाला. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचालक, प्रतिनिधी कार्यशाळेत ते बोलत होते. राजर्षी शाहू समागृहात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संस्थापक आणि बहुतांश प्राचार्य उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये आघाडी घेतली आहे. या अनुषंगाने आवश्यक ते बदल करून विद्यार्थ्यांचे नुकसान टाळले पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणापासून सुटका नसल्याने उलटसुलट चर्चा करत बसू नये. शासनाने अभ्यासक्रमाचा मसुदा तयार करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत दिली आहे. ३१ डिसेंबरपर्यंत सर्व बाबींची पूर्तता करावी.

### भविष्यात शिवाजी विद्यापीठ एक संस्था असेल

नवीन शैक्षणिक धोरणानुसार २०३५ पर्यंत सर्वच शैक्षणिक संस्था स्वायत्त करून क्लस्टर विद्यापीठ केली जातील. तसेच सर्व क्लस्टर विद्यापीठांना पदवी प्रमाणपत्र देण्याचा अधिकार दिला जाईल. त्यामुळे भविष्यात शिवाजी विद्यापीठ एक शिक्षण संस्था असेल, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

२०२४–२५ पासून धोरणाची अंमलबजावणी होणार आहे.

प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, शिक्षणाबरोबरच संशोधन, कौशल्य यांचाही विचार केला आहे. त्यासाठीच बहुशाखीय शिक्षण व संशोधनास प्रोत्साहनाचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. त्यांचे स्वरुप समजून घेणे फार गरजेचे आहे. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी मार्गदर्शन केले. उपकुलसचिव विलास सोयम यांनी स्वागत केले. यावेळी संस्थापक चिमण डांगे, डॉ. क्रांतिकुमार पाटील, सतीश घाळी, धैर्यशील पाटील, प्राचार्य आर. जी. कुलकर्णी, डॉ. व्ही. एम. पाटील, सर्व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आदी उपस्थित होते.

2 6 JUL 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक धोरणाचे लाभ देण्यास प्रयत्न आवश्यक

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, 'एनईपी-२०२० वीक एसयूके'ला प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदलांचे वारे घेऊन आले आहे. शिक्षण क्षेत्रात कार्यरत सर्वच घटकांनी विद्यार्थ्यांना धोरणाचे दूरगामी लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. विद्यापीठात राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या त्रैवार्षिक पूर्तीच्या निमित्ताने 'एनईपी-२०२० वीक एसयूके'चा प्रारंभ झाला. या निमित्ताने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचालक,



कोल्हापूर : विशेष कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.

प्रतिनिधी यांच्यासाठी विशेष कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये राज्यात आघाडी घेतली आहे. या धोरणाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करण्यासाठी अत्यंत लवचिकतेने आणि विद्यार्थ्यांचे कोठेही नुकसान होणार नाही, या पद्धतीने पावले उचलली आहेत.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, उच्च शिक्षण संस्थांच्या संरचना व कार्यामध्ये मूलभूत स्वरूपाचे बदल नव्या धोरणामुळे येत आहेत. डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी मार्गदर्शन केले. उपकुलसचिव विलास सोयम यांनी आभार मानले.

लोकमत

# शैक्षणिक धोरण सप्ताहाचे उद्घाटन

कोल्हापूर : नवीन शैक्षणिक धोरण २०२० याविषयी राज्य सरकार २४ ते २९ जुलै या कालावधीत सप्ताह साजरा करत आहे. शिवाजी विद्यापीठात होणाऱ्या या सप्ताहाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते येथील मानव्यशास्त्र अधिविभागातील राजर्षी शाहू महाराज सभागृहात सोमवारी झाले. यावेळी प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, संलग्नता विभागाचे उपकुलसचिव विलास सोयम, मानव्यशास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांच्यासह सर्व महाविद्यालयतील प्राचार्य उपस्थित होते.

पुढारी

# ग्रंथ अध्ययनाची ओढ निर्माण करण्याची गरज

## डॉ. राजेंद्र कुंभार : विद्यापीठात ग्रंथालय, माहितीशास्त्र विषयावर राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

वाचक, अभ्यासकांना वाचनासाठी प्रवृत्त करण्याबरोबर त्याचे महत्त्व व ग्रंथ अध्ययनाची ओढ निर्माण करणे, ग्रंथालयांचे सध्याच्या युगातील अस्तित्व टिकवणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे माजी प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रामार्फत 'रिव्हॅम्पिंग लायब्ररीज इन मॉडर्न इरा' विषयावर आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. कुंभार यांनी पारंपरिक ग्रंथालये व इंटरनेट युगात ग्रंथालयांना रूपांतरित करण्याबाबत मार्गदर्शन केले. 'ग्रंथालय आपल्या द्वारी' हा मार्केटिंगचा नवा ट्रेंड समोर आणला. बदलत्या काळानुसार ग्रंथालयीन सेवेतील आमूलाग्र बदल, डिजिटल हस्तांतरित करणे महत्त्वाचे आहे.



कोल्हापूर : विद्यापीठ ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रामार्फत आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. डी. बी. सुतार आदी.




प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तरतुदीनुसार ज्ञान स्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाकडून अद्ययावत व सज्ज असायला हवे. ज्ञान स्रोत केंद्राचे प्र. संचालक डॉ. डी. बी. सुतार यांनी स्वागत केले. ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. 'सोल' ग्रंथालय संगणकीकरण प्रणालीमधून एम-ओपॅक या ग्रंथालयातील उपलब्ध माहिती स्त्रोतसंबंधी ॲपचे ऑनलाईन लाँचिंग झाले.

यावेळी सहसचिव डॉ. युवराज जाधव यांनी परिषदेचा अहवाल सादर केला. डॉ. शिवराज थोरात यांनी आभार मानले.

२६ ।।।। २०२३

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नागरी सहकारी बँकांचे समाजातील स्थान महत्त्वाचे

## डॉ. श्रीकृष्ण महाजन : विद्यापीठात दोन दिवसीय मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**
नागरी सहकारी बँकांचे समाजातील स्थान महत्त्वाचे आहे. त्यांनी स्पर्धात्मक युगात कायम अग्रेसर राहण्यासाठी आधुनिकतेची कास धरायला हवी, असे प्रतिपादन डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. शिवाजी विद्यापीठामध्ये दोन दिवसीय मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅमच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाच्या गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र व कोल्हापूर नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नागरी सहकारी बँकांच्या शाखाधिकाऱ्यांसाठी 'कॅपॅसिटी बिल्डिंग प्रोग्रॅम फॉर मॅनेजर्स ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स ऑफ कोल्हापूर डिस्ट्रिक्ट' हा दोन दिवसीय मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम घेण्यात आला. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये कुंभी-कासारी सहकारी बँकेचे सीईओ दत्तात्रय राऊत यांनी आरबीआयच्या विविध मापदंडासंदर्भात माहिती दिली. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया चेअरचे प्रा. डॉ. राजन पडवळ म्हणाले, नागरी सहकारी बँकांना पब्लिक व प्रायव्हेट सेक्टर बँकांबरोबरच परदेशी बँकांच्या स्पर्धेला सामोरे जावे लागते. त्यामध्ये तग धरून यशस्वी होण्यासाठी व्यावसायिक व आधुनिक व्यवस्थापकीय दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. तिसऱ्या सत्रामध्ये आजरा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे सीईओ प्रशांत गंभीर यांनी बँकिंग क्षेत्रामध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या कायद्यांची ओळख करून दिली. रविवारी उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी श्री पंचगंगा सहकारी बँकेचे सीईओ दीपक फडणीस, सायबरच्या कौन्सिलर ऊर्मिला चव्हाण व अपना सहकारी बँकेच्या अधिकारी राणी काशीकर यांनी मार्गदर्शन केले.



26 JUL 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे निर्णय; अकरावी प्रवेशाची मुदत वाढविली

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा पुन्हा स्थगित



कोल्हापूर, ता. २५ : भारतीय हवामान खात्याने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत उद्या, बुधवार आणि गुरुवारी (ता. २८) अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने या दोन्ही दिवसांतील पदवी, पदव्युत्तर अशा चार अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी विद्यापीठाने अतिवृष्टीमुळे १३ जुलैच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या.

बी. टेक., बी. फार्मसी., एम. बी. ए., आणि एम. सी. ए. या चार अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित केल्या आहेत. त्यासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३४८२ इतकी आहे. शुक्रवार (ता. २८) पासून परीक्षा पूर्ववत सुरू होणार आहेत. दरम्यान, एम. बी. ए., बी. फार्मसी., एम. सी. ए. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा आज झाल्या. त्यासाठी १९३२ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने बी. आर्किटेक्चर., एम. एस्सी.फूड सायन्स, एम. ए. इकॉनॉमिक्स, बी. जे., अशा विविध १६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. दरम्यान, शहरातील विविध कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावीची चौथी फेरीतील प्रत्यक्ष प्रवेशातील आज अखेरचा दिवस होता. मात्र, जिल्ह्यात अतिवृष्टी सुरू असल्याने प्रवेशाची मुदत गुरुवार पर्यंत वाढविण्यात आली आहे.

## 'त्यांची' परीक्षा खेळाडू विद्यार्थ्यांसमवेत

- विद्यापीठ परिक्षेत्रामध्ये काही भागांमध्ये अतिवृष्टीमुळे रस्ते बंद झाले आहेत. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना उपस्थित राहताना अडचण उद्भवत आहेत. जे विद्यार्थी अतिवृष्टीमुळे परीक्षेस उपस्थित राहू शकणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा खेळाडू विद्यार्थ्यांसमवेत घेण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांची माहिती परीक्षा मंडळाने महाविद्यालयांकडून मागविली आहे.

'अतिवृष्टीमुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी बुधवार आणि गुरुवारच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. या परीक्षांचे नवीन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर लवकरच जाहीर करण्यात येईल.

**- डॉ. अजितसिंह जाधव,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

2 6 JUL 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा दोन दिवस स्थगित

## अतिवृष्टीमुळे निर्णय, शुक्रवारपासून पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या कोल्हापूरसह सांगली आणि सातारा या तिन्ही जिल्ह्यांना हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या दि. २६ व २७ जुलै रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. २५ मेपासून सुरू आहेत; मात्र पूर परिस्थिती व अतिवृष्टीमुळे या परीक्षांत व्यत्यय येत आहे. सातारा जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे गुरुवार, दि. २० जुलै रोजी होणाऱ्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. आता पुन्हा तिन्ही जिल्ह्यांसाठी देण्यात आलेला अतिवृष्टीचा इशारा आणि पूर परिस्थितीमुळे बुधवार आणि गुरुवारी होणाऱ्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत, तर शुक्रवार, दि. २८ जुलैपासूनच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील, अशी माहितीही डॉ. जाधव यांनी दिली आहे.

दरम्यान, मंगळवारी ३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी एकूण १९३२ विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभरात १६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले असून, आजअखेर ५८१ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या आज, उद्याच्या परीक्षा स्थगित

## अतिवृष्टीचा परिणाम : शुक्रवारपासून पूर्ववत

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोल्हापूर, सांगली, सातारा व या तिन्ही जिल्ह्यांत अतिवृष्टीचा इशारा दिल्याने शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील बुधवार व गुरुवारी होणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जिल्ह्यातील अनेक बंधारे पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे प्रमुख गावे, शहराशी जोडणारे मार्ग बंद झाले आहेत. त्यातच हवामान विभागाने कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यात बुधवार व गुरुवारी अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर या दोन दिवशी होणाऱ्या विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित केल्या. स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांचे नवीन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर लवकरच जाहीर केले जाईल. २८ जुलैपासून परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील, असे असे डॉ. जाधव यांनी सांगितले. मंगळवारी एमबीए, बीफार्मसी यासह तीन परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या.

तरूण भारत

# दोन दिवसांच्या परीक्षा स्थगित

प्रतिनिधी
कोल्हापूर



- अतिवृष्टी अन पूराच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाचा निर्णय
- २८ जुलैपासून पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा होणार

भारतीय हवामान खात्याने राज्यभर अतिवृष्टीचा अंदाज वर्तवला. यामुळे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या २६ व २७ जुलैच्या सर्व परीक्षा स्थगित केल्या आहेत. शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये म्हणून शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने हा निर्णय घेतला. स्थगित केलेल्या परीक्षांचे नवीन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करणेत येईल. तसेच २८ जुलैपासूनच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील, तरी विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मंगळवारी १ हजार ९३२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन या विषयांचा समावेश आहे. मंगळवारी झालेल्या परीक्षेत कोणताही गैरप्रकार सापडला नाही. विद्यापीठाने बुधवार व गुरूवारी होणाऱ्या दोन दिवसाच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित केल्या. अतिवृष्टीमुळे पंचगंगा नदीतील पाण्याची पातळी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये म्हणून २६ आणि २७ जुलैच्या परीक्षा स्थगित केल्या आहेत.

TIME'S OF INDIA

# SUK varsity postpones examinations

TIMES NEWS NETWORK

Kolhapur: The Shivaji University-Kolhapur (SUK) has postponed its exams scheduled on July 26 and 27 due to the incessant rainfall and flood-like situation.

Dr Ajitsinh Jadhav, the director of exam and evaluation department, said, "The districts of Kolhapur, Sangli and Satara are warned for heavy rain on Wednesday and Thursday. Therefore, to make sure that no student is deprived of the chance to sit for the exams, the tests have been postponed."

पुढारी

# विद्यापीठाच्या आज, उद्याच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



भारतीय हवामान खात्याने २६ व २७ जुलै रोजी सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यास अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या यादिवशी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत.

कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये, यासाठी या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. परीक्षांचे नवीन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. २८ जुलैपासूनच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# महावीर अध्यासनास दिगे यांची देणगी

**कोल्हापूर :** भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी शाहूपुरी येथील धनंजय बंडोबा दिगे यांनी ५० हजार रुपयांची देणगी दिली. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे नातू जयदेव बाहुबली दिगे उपस्थित होते. दिगे यांचा सत्कार शाल व विद्यापीठ बोधचिन्ह आणि ग्रंथ देऊन करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. विजय ककडे उपस्थित होते.

लोकमत



शिवानंद कांबळे



रोहित नलवडे

# विद्यापीठाच्या दोघांचे एमपीएससीत यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील विद्यार्थी शिवानंद रुक्माना कांबळे व रोहित दत्तात्रय नलवडे या दोघांची असिस्टंट केमिकल ॲनालायझर राजपत्रित अधिकारी (वर्ग-२) पदी निवड झाली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने ही परीक्षा घेण्यात आली होती. हे दोघेही लवकरच महाराष्ट्रातील फॉरेन्सिक लॅबमध्ये रूजू होणार आहेत. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. रसायनशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. के.डी. सोनवणे, डॉ. के.एम. गरडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

# विद्यापीठाचे काळसेकर पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा २०२३ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांना, तर 'ऋत्विज काळ्सेकर काव्य पुरस्कार' कवी वर्जेश सोळंकी (मुंबई) यांना जाहीर करण्यात आला. या दोन्ही पुरस्कारांचे वितरण लवकरच शिवाजी विद्यापीठातर्फे करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ कवी, लेखक आणि ग्रंथप्रेमी सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ काळ्सेकर कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाकडे दिलेल्या देणगीतून काळसेकर यांच्या नावाने प्रतिवर्षी मराठी कवितेत योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कवीस 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' आणि तरुण कवीस ऋत्विज काळ्सेकर यांच्या नावाने पुरस्कार देण्यात येतात. सतीश काळसेकर काव्य पुरस्कार कवी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांना, तर 'ऋत्विज काळ्सेकर काव्य पुरस्कार' कवी वर्जेश सोळंकी यांना देण्यात येणार आहे.

पुण्यनगरी

# दूरशिक्षण समाजातील विविध घटकांसाठी उपयुक्त : डॉ. पाटील

**कोल्हापूर :** दूरशिक्षण समाजातील विविध घटकांसाठी उपयुक्त आहे. त्यामुळे दूरशिक्षण पद्धतीचा लाभ आपण घेतला पाहिजे, असे प्रतिपादन समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या अनुषंगाने विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांसाठी आयोजित उद्‌बोधन वर्गात ते बोलत होते. डॉ. पाटील म्हणाले, शैक्षणिक जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी उद्‌बोधन वर्ग महत्त्वाची भूमिका पार पडत असतात. ज्ञान, वृत्ती आणि कौशल्य विकसित करण्यासाठी व प्रशासकीय पदोन्नतीसाठी दूरशिक्षण आवश्यक आहे. डॉ. प्रवीण लोंढे यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. यावेळी समन्वयक डॉ. सी. ए. बंडगर, डॉ. पी. बी. बेळ्ळीकट्टी, बी. आर. पाटोळे, पी. एस. कांबळे, डी. पी. गावडे, डॉ. एस. व्ही. माने, प्रशासकीय सेवक व्ही. व्ही. वरुटे, व्ही. एम. मोहिते, डी. एस. करवडे, एस. एस. आडनाईक, पी. पी. जाधव आदी उपस्थित होते.

पुढारी

# 'दूरशिक्षण' मधील एमबीए विद्यार्थ्यांची आयटी कंपन्यांत निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एमबीए अभ्यासक्रमांच्या ३७ विद्यार्थ्यांची विविध आयटी कंपन्यात निवड झाली आहे.

टाटा स्ट्राईव्ह व गुगल यांच्या संयुक्तिक विद्यमाने राबविण्यात येणारे डाटा ॲनालोटिक्स, आयटी सपोर्ट, यू. एक्स. डिझाईन, आयटी ऑटोमेशन, डिजिटल मार्केटिंग कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र ऑनलाईन अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठातील सेंट्रल ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेल यांनी सुरू केले आहेत. एमबीएच्या विद्यार्थ्यांना कौशल्य आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा फायदा होऊन कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची विविध आयटी कंपन्यांत निवड झाली आहे. अशी माहिती दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

2 6 JUL 2023

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीसाठी सहा वर्षांचे बंधन रद्द

## शिवाजी विद्यापीठाचा निर्णय

कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाने यापूर्वीच्या विद्यापीठ कायद्यांनुसार अस्तित्वात आलेल्या ज्या दंडकांमुळे विद्यार्थ्यांवर पदवी अभ्यासक्रम सहा वर्षांत पूर्ण करण्याचे बंधन होते ते दंडक आता रद्द करण्यात आले आहे. ही माहिती विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली.

डॉ.शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, नव्या शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांचे कोणत्याही स्तरावरील शिक्षण खंडित होऊ नये, तसेच काही कारणांनी शिक्षणापासून दुरावल्यास पुन्हा उर्वरित शिक्षण पूर्ण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या पूर्वीच्या कायद्यानुसार अस्तित्वात आलेले दंडक ७९ व ८० (अ) हे या धोरणातील तरतुदीला छेद देणारे ठरत असल्याने ते रद्द करण्याची शिफारस विद्यापीठाने मा. कुलपती कार्यालयाला केली होती. ती शिफारस मान्य करण्यात आली आहे..

पूर्वी दंडक ७९ नुसार पदवी स्तरावरील विद्यार्थी कोणत्याही एका वर्षातील परीक्षेत एखाद्या विषयात अनुत्तीर्ण झाला असल्यास त्या वर्षात असणारे सर्व विषय त्या परीक्षेच्या सत्रापासून सहा वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक होते. विद्यार्थी जर सहा वर्षांत त्या विषयांत उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर सहा वर्षांपूर्वी ज्या विषयात उत्तीर्ण झाला असेल, त्या संपूर्ण वर्षामध्ये असणाऱ्या विषयांची परीक्षा त्याला पुन्हा संबंधित वर्गात नव्याने प्रवेश घेऊन द्यावी लागत असे. सदरची अट आता रद्द करण्यात आली आहे.तसेच दंडक ८० (अ) नुसार बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.या पदवी अभ्यासक्रमातील नियमित अथवा दूरस्थ विद्यार्थ्यांस त्याच्या प्रथम परीक्षेपासून सहा वर्षांत संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि, जर विद्यार्थी निर्धारित वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करू शकला नाही, तर त्याची भाग १, २ व ३ मधील परीक्षेची संपूर्ण संपादणूक रद्द होत असे आणि त्याला पुनश्च परीक्षा द्याव्या लागत असत. हा दंडकही आता रद्द करण्यात आला आहे.

# पदवी अभ्यासक्रम सहा वर्षांत पूर्ण करण्याचे बंधन आता दूर

कोल्हापूर(प्रतिनिधी):- राज्यामध्ये नवे शैक्षणिक धोरण राबविण्यामध्ये आघाडी घेत असतानाच त्याच्याशी सुसंगत असे निर्णय घेण्याच्या बाबतीतही येथील शिवाजी विद्यापीठ पुढे सरसावले आहे. यापूर्वीच्या विद्यापीठ कायद्यांनुसार अस्तित्वात आलेल्या ज्या दंडकांमुळे विद्यार्थ्यांवर पदवी अभ्यासक्रम सहा वर्षांत पूर्ण करण्याचे बंधन होते ते दंडक (ऑर्डिनन्स) क्रमांक ७९ आणि ८० (अ) आता रद्द करण्यात आले आहेत. ही माहिती विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी येथे दिली.

डॉ. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, नव्या शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांचे कोणत्याही स्तरावरील शिक्षण खंडित होऊ नये, तसेच काही कारणांनी शिक्षणापासून दुरावल्यास पुन्हा उर्वरित शिक्षण पूर्ण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या पूर्वीच्या कायद्यानुसार अस्तित्वात आलेले दंडक ७९ व ८० (अ) हे या धोरणातील तरतुदीला छेद देणारे ठरत असल्याने ते रद्द करण्याची शिफारस विद्यापीठाने मा. कुलपती कार्यालयास केली होती. ती शिफारस मान्य करण्यात आली आहे.

पूर्वी दंडक ७९ नुसार पदवी स्तरावरील विद्यार्थी कोणत्याही एका वर्षातील परीक्षेत एखाद्या विषयात अनुत्तीर्ण झाला असल्यास त्या वर्षात असणारे सर्व विषय त्या परीक्षेच्या सत्रापासून सहा वर्षांत उत्तीर्ण होणे आवश्यक होते. विद्यार्थी जर सहा वर्षांत त्या विषयांत उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर सहा वर्षांपूर्वी ज्या विषयात उत्तीर्ण झाला असेल, त्या संपूर्ण वर्षामध्ये असणाऱ्या विषयांची परीक्षा त्याला पुन्हा संबंधित वर्गात नव्याने प्रवेश घेऊन द्यावी लागत असे. सदरची अट आता रद्द केली आहे.

तसेच दंडक ८० (अ) नुसार बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी. या पदवी अभ्यासक्रमातील नियमित अथवा दूरस्थ विद्यार्थ्यांस त्याच्या प्रथम परीक्षेपासून सहा वर्षांत संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक होते.तथापि,जर विद्यार्थी निर्धारित वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करू शकला नाही, तर त्याची भाग १, २ व ३ मधील परीक्षेची संपूर्ण संपादणूक रद्द होत असे आणि त्याला पुनश्च परीक्षा द्याव्या लागत असत. हा दंडकही आता रद्द करण्यात आला आहे.

या दोन्ही दंडकांमध्ये असणारी तरतूद राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने बदलणे आवश्यक असल्याने विद्यापीठाकडून हे दंडक रद्द करण्याबाबतची कार्यवाही आता पूर्ण झालेली आहे. आता विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कॅडेमिक क्रेडिटस् घेता येतील आणि ते कॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये एकत्रित जमाही करता येतील.